# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## बांधकाम विभाग
// गोषवारा //

दि. ०५/०८/२०२५

**प्रकरण क्र:-** ( १८४ ) मा.आयुक्त यांनी मंजूर केलेल्या कामांचे अवलोकन करणे.

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात प्रभाग समिती क्र.४,५ व ६ विविध उद्यानांमध्ये प्लबिंग विषयक कामे करणे व मोटार पंम्प बसविणे. (अंदाजित खर्च रु. १७,१६,६०६/-) (टेंडर आयडी क्र. ११९८१५५_१) (ई- १३८०५३३_१)**

| अ. क्र | टेंडर आय डी | कामाचे नाव | अंदाजित खर्च | निविदाधारकाचे नाव | सादर केलेला दर |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1. | ११९८१५५_१ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात प्रभाग समिती क्र.४.५ व ६ विविध उद्यानांमध्ये प्लबिंग विषयक कामे करणे व मोटार पंम्प बसविणे. | रु.१७,१६,६०६/- | **मे. क्लासिक वर्क्स** | **२.५०००% कमी दराने** |

वरील कामी **मे. क्लासिक वर्क्स** या निविदाधारकाने **२.५०००% कमी दराने** निविदा सादर केली आहे. मा.आयुक्त महोदय यांनी सदरचे दर स्विकारण्यास मान्यता दिलेली आहे.

नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दि.२६ ऑगस्ट २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतुदीनुसार मा.आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असुन त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत.

तरी सदर कामास मा.आयुक्त यांनी जी.एस.टी. सह मंजुरी दिली असुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ७३ (ड) नुसार अवलोकनार्थ मान्यता देण्यास शिफारस आहे.

**(दिपक खांबित)**
**शहर अभियंता**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## प्रशासकीय ठराव दिनांक ०५/०८/२०२५

**प्रकरण क्र. ( १८४ )** :- मा.आयुक्त यांनी मंजूर केलेल्या कामांचे अवलोकन करणे.

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात प्रभाग समिती क्र.४,५ व ६ विविध उद्यानांमध्ये प्लबिंग विषयक कामे करणे व मोटार पंम्प बसविणे. (अंदाजित खर्च रु. १७,१६,६०६/-) (टेंडर आयडी क्र. ११९८१५५_१) (ई- १३८०५३३_१)**

ठराव क्र. ( १८४ )

| अ. क्र | टेंडर आय डी | कामाचे नाव | अंदाजित खर्च | निविदाधारकाचे नाव | सादर केलेला दर |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1. | ११९८१५५_१ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात प्रभाग समिती क्र.४,५ व ६ विविध उद्यानांमध्ये प्लबिंग विषयक कामे करणे व मोटार पंम्प बसविणे. | रु.१७,१६,६०६/- | **मे. क्लासिक वर्क्स** | **२.५०००% कमी दराने** |

वरील कामी **मे. क्लासिक वर्क्स** या निविदाधारकाने **२.५०००% कमी दराने** निविदा सादर केली आहे. मा.आयुक्त महोदय यांनी सदरचे दर स्विकारण्यास मान्यता दिलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) च्या (१अ) व (१ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक २६ ऑगस्ट २०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, राधाबिनोद शर्मा, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास वरील दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ७३ (ड) नुसार प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(राधाबिनोद अ. शर्मा, भाप्रसे)
**प्रशासक तथा आयुक्त**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रत बांधकाम विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**

PC-8/25-26/DK/ST-42

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## नगररचना विभाग

## // गोषवारा //

दि. ०५/०८/२०२५

**प्रकरण क्र.** (१६५): मिरा भाईंदर शहराच्या मंजुर विकास योजनेमध्ये मौजे घोडबंदर राज्यमार्ग क्र.84 (फाऊटंन हॉटेल ते गायमुख पर्यंत) मौजे वरसावे येथील स.क्र.21पै., 32पै., 33पै., 34पै., मौजे चेणे येथील स.क्र.4पै., 5पै., 8पै., 9पै., 10पै., 13पै., 14पै., 15पै., 18पै., 26पै., 37पै., 43पै., 44पै., 45पै., 46पै., 47पै., 48पै., 50पै., 52पै., 68पै., 69/1पै., 70/1पै., 81पै., 82पै., 89पै., 99पै., 101पै., 144पै., 148पै., व इतर तसेच गावठाण (काजुपाडा) स.क्र.83पै., 67पै.,, गावठाण (चेणा) चेणा नदी या जमिनीमधील मंजुर विकास योजनेनुसारचा 30.00 मी. रुंदीचा रस्ता 60.00 मी. रुंद प्रस्तावित करणेच्या अनुषंगाने मंजुर विकास योजनेमध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 210 अन्वये रस्त्याची अंतिम रेषा विहित करणेच्या अनुषंगाने मंजुरी मिळणेबाबत.

1) मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन अधिसूचना क्र. टीपीएस-1296/847/सीआर-162/96/युडी-12, दि.14/05/97 अन्वये मंजूर करण्यात आलेली असून ती दि.15/07/97 पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र. टीपीएस-1298/941/सीआर-89/98/युडी-12, दि.25/08/2000 अन्वये मंजूर झालेली असून ती दि.15/10/2000 पासून अंमलात आलेली आहे.

2) मिरा भाईंदर महानगरपालिकेची प्रारुप सुधारीत विकास योजना कलम 26 अन्वये दि. 27/10/2022 रोजी प्रसिद्ध होवुन ती अधिनिमाचे कलम 30 खालील तरतुदीनुसार नियुक्त अधिकारी तथा सहायक संचालक नगररचना, ठाणे शाखा, ठाणे जिल्हा यांनी दि.25/11/2023 रोजी मंजूरीसाठी शासनास सादर केली असून ती अद्याप मंजूर झालेली नाही.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील फाऊंटन गायमुख 30.00 मी. रुंदीचा रस्ता असुन सदर रस्ता हा ठाणे घोडबंदर राज्यमार्ग क्र.84 असुन सदर रस्त्याचे मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील फाऊंटन गायमुख रस्ता 60.00 मी. रुंद केल्यास त्यांचा फायदा नागरीकांना होणार असल्याने सदर रस्त्याबाबत मा.शासनाने दि.07/10/2024 रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 205, 210 नुसार महापालिका आयुक्तांना मंजुर विकास योजना रस्त्याबाबतची संरेखा निश्चित करणेबाबत कळविले असुन याबाबतची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे.

3) सदरच्या मंजुर विकास योजनेनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील फाऊंटन ते गायमुख हा प्रस्तावित रस्ता 30.00 मी. रुंदीचा असुन, सदर रस्ता हा ठाणे घोडबंदर राज्यमार्ग क्र.84 असा असून, सदर रस्त्याचे समुचित प्राधिकरण व अंमलबजावणी संस्था ही सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र राज्य असून, सदर रस्ता हस्तांतरीत करून घेणेकामी सार्वजनिक बांधकाम विभागाने त्यांचेकडील पत्र क्र.अअ/ठाण/प्रशा-1/3899 दि.21/06/2024 रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेस विनंती केली असून, सदर रस्त्याच्या अनुषंगाने मा.विधानसभा सदस्य श्री.प्रताप सरनाईक यांनी दि.25/06/2024 रोजीच्या पत्रान्वये मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील फाऊंटन हॉटेल ते गायमुख रस्ता 60.00 मी. रुंद केल्यास त्याचा फायदा नागरीकांना होणार असल्याने, सदर रस्ता शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडुन ताब्यात घेवुन सदर रस्त्याचे सर्वेक्षण करुन नविन विकास आराखडयामध्ये सदर रस्त्याचा समावेश करणेची विनंती महानगरपालिकेकडे केली आहे. सदर रस्ता हस्तांतरणाच्या अनुषंगाने महानगरपालिकेने प्रशासकीय ठराव क्र.100 दि.08/08/2024 रोजी पारीत करुन सदर रस्ता महानगरपालिकेकडे हस्तांतरण करणेबाबत पत्र क्र.सांबा/2603/2024-25 दि.13/08/2024 च्या पत्रान्वये अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे यांना कळविले आहे.

4) विषयांकित रस्त्याच्या अनुषंगाने तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील इतर रस्ते विकसनाच्या अनुषंगाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे कार्यालयामध्ये दि.22/07/2024 रोजी बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार फाऊंटन ते गायमुख हा रस्ता विकास योजनेमध्ये 60.00 मी. रुंद प्रस्तावित करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 च्या तरतुदीनुसार महानगरपालिकेने कार्यवाही करणेबाबत झालेल्या चर्चेचे इतिवृत्त मुंबई महानगर विकास प्राधिकरण यांच्याकडील दि.02/08/2024 रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाले आहे. तसेच तद्नंतर विषयांकित रस्त्याच्या अनुषंगाने व महानगरपालिका हद्दीतील इतर विकास कामाच्या अनुषंगाने पुनश्च: दि.06/08/2024 रोजी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या कार्यालयामध्ये बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये फाऊंटन हॉटेल ते गायमुख हा रस्ता अस्तित्वातील रस्त्यासह 60.00 मी. प्रमाणे एका बाजुने (फाऊंटन हॉटेल ते गायमुख कडे जातांना उजव्या बाजुने) रुंद प्रस्तावित केल्यास त्याचे विकसन करण्यात अडचण येणार नसल्याने त्याबाबत मंजुर विकास योजनेमध्ये फेरबदल प्रस्ताव न करता प्रारुप विकास योजना शासनास सादर केलेली असल्याने सदर प्रारुप विकास योजनेमध्ये बदल करणेकामीचा प्रस्ताव शासनास सत्वर सादर करावा असे बैठकीमध्ये निर्देश दिले आहेत.

5) उपरोक्त नमुद केल्यानुसार रस्त्याची रुंदी 60.00 मी. करण्याच्या अनुषंगाने महानगरपालिकेकडुन खाजगी सर्व्हेअरमार्फत सर्व्हे करताना त्यानुसार बाधित होणाऱ्या स.क्र.21 पैकी, भुखंड क्र.अ/1 हॉटेल फाऊंटन तसेच स.क्र.21/1/क मधील शेलार प्रापर्टीज यांचे Express In या हॉटेल करीता परवानगी घेवुन भोगवटा घेतला असल्याने, व सदर रस्ता 30.00 मी. रुंद असताना यापुर्वी सदर हॉटलेची काही जागा 30.00 मी. पेक्षा जास्त रस्ता रुंदीकरण करण्यासाठी दिलेली असल्याने एका बाजुस रस्ता

रुंदीकरण करणेकामी हरकत घेतली आहे. सदर स.क्र.21/पै.,(भुखंड-अ - हॉटेल फांऊटन) च्या जमिनीस महानगरपालिलकेने पत्र क्र.मनपा/नर/86/3746/03-04 दि.28/10/03 अन्वये तसेच मौजे वरसावे येथील स.क्र.21पैकी, भु.क्र.अ/1 (Hotel Express In) या हॉटेलसाठी महानगरपालिकेने पत्र क्र.मनपा/नर/777/2004-05, दि.22/07/2004 अन्वये भोगवटा दाखला दिलेला असुन, सदर दोन्ही आरक्षणाच्या समोर 30.00 मी. ऐवजी जवळपास 40 ते 50 मी. रुंद रस्ता जागेवर असल्याने, सदर आस्थापनेच्या समोरील अस्तित्वातील रस्ता व त्यालगत असलेला भराव याबाबी विचारात घेता सदर ठिकाणी सदर आस्थापनेच्या जमिनीच्या हद्दीपासुन डाव्याबाजुस रस्ता विकसित होवु शकतो त्यामुळे सदर ठिकाणी रस्त्याचे जक्शन असल्याने रस्ता जंक्शन व रस्त्याची सलगता राहणेच्या अनुषंगाने फाऊंटन हॉटेल ते शासकिय विश्रामगृह यापर्यंत वर नमुद केल्यानुसार रस्ता विकसीत करता येवु शकेल. तसेच ठाणे महानगरपालिकेने त्यांचे क्षेत्राची विकास योजना प्रसिध्द केली असुन, त्यामध्ये ठाणे महानगरपालिका हद्दीच्या ठिकाणी मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीच्या ठिकाणी सदर रस्ता दोन्ही बाजुस समप्रमाणात रुंदीकरण प्रस्तावित असल्याने दोन्ही महानगरपालिका हद्दीमध्ये सदर रस्त्याच्या आखणीमध्ये सलगता व एकसुत्रता राहणेच्या अनुषंगाने ठाणे महानगरपालिका हद्दीलगतच्या आखणीमध्ये त्यानुसार दोन्ही बाजुस रुंदीकरण करुन त्याठिकाणच्या रस्त्याच्या आखणीमध्ये एकसलगता / एकसुत्रता करणे आवश्यक आहे.

6) मंजुर विकास योजनेनुसारचा 30.00 मी. रुंदीचा रस्ता 60.00 मी. रुंद प्रस्तावित करणेच्या अनुषंगाने महानगरपालिकेने पत्र क्र.मिभा/मनपा/सांबा/2928/2024-25 दि.30/08/2024 रोजीच्या पत्रान्वये सदर रस्त्याची आखणी 60.00 मी. रुंद करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 154 अन्वये निर्देश देण्याची विनंती शासनास केली असता शासनाने त्यांचेकडील पत्र क्र.टिपीएस-1214/1534/प्र.क.97/24/नवि-12 दि.07/10/2024 अन्वये सदर "फाऊंटन ते गायमुख या दरम्यानच्या 30.00 मी. रुंद रस्ता मंजूर विकास योजनेमध्ये 60.00 मी. रुंद रस्ता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाच्या कलम 154 अन्वये दर्शविण्याची विनंती शासनास केली असली तरी मंजूर विकास योजनेमध्ये कलम 154 अन्वये फेरबदल करता येत नाही. त्यामुळे महानगरपालिकेची सदरचा रस्ता कलम 154 अन्वये मंजूर विकास योजनेमध्ये दर्शविण्याची विनंती मान्य करता येत नाही. तथापि, सदरचा रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 205, 210 नुसार महानगरपालिका आयुक्तांना मंजूर विकास योजनेमध्ये दर्शविता येईल. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांतर्गत दर्शविलेले रस्ते देखील UDCPR मधील तरतुदीनुसार विकसित करण्यास मान्यता असल्याचे शासनाने महानगरपालिकेस कळविले आहे.

7) सदरच्या मंजुर विकास योजनेनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील फाऊंटन ते गायमुख हा प्रस्तावित रस्ता 30.00 मी. रुंदीचा असुन, सदर रस्ता हा ठाणे घोडबंदर राज्यमार्ग क्र. 84 असा असून, सदर रस्त्याचे समुचित प्राधिकरण व अंमलबजावणी संस्था ही सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र राज्य ही होती तथापि दरम्यानच्या कालावधीमध्ये सदर रस्ता हा महानगरपालिकेकडे

हस्तांतरीत करुन घेणेकामी मा.अधिक्षक अभियंता यांनी पत्र क्र.सांबा/2603/2024-25 दि.13/08/2024 अन्वये महानगरपालिकेस कळविले असता महानगरपालिकेने मा.अधिक्षक अभियंता यांना दि.13/08/2024 रोजीच्या पत्रान्वये सदर रस्ता हस्तांतरीत करुन देण्याची कार्यवाही करणेबाबतची विनंती केली असता सदर रस्ता शासनाने, शासन निर्णय क्र. रविओ-2024/प्रक्र.54/नियोजन-2 दि.03/01/2025 (फाऊंटन हॉटेल ते गायमुख) अन्वये राज्यमार्ग क्र.84 (4.40 कि.मी.) रस्ता मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केला आहे.

मिरा भाईंदर शहराची प्रारुप सुधारीत विकास योजना नियुक्त अधिकारी तथा सहाय्यक संचालक नगररचना ठाणे शाखा कार्यालय यांनी कलम-26 अन्वये दि.28/10/2022 रोजी प्रसिद्ध करुन ती कलम 30 अन्वये दि.25/10/2023 रोजी शासनास मंजुरीसाठी सादर केली असुन सदर विकास योजना अदयाप मंजुर झालेली नाही. सदरच्या प्रारुप विकास योजनेनुसार मिरा भाईंदर हद्दीमधील फाऊंटन हॉटेल ते गायमुख हा रस्ता जागेवर विकसीत झाल्यानुसारच्या अस्तित्वातील रुंदीसह एकुण 30.00 मी. रुंदी प्रमाणे प्रस्तावित असुन, सदर रस्ता हा फाऊंटन हॉटेल ते शासकीय विश्राम गृह पर्यंत अंदाजे 45 ते 50 मी. रुंद विकसीत झालेला असुन तसे प्रारुप विकास योजना नकाशावर अंतर्भुत आहे तर इतर ठिकाणी सदरचा प्रस्तावित 30.00 मी. रुंदीचा रस्ता हा 30.00 मी. रुंदीच्या मर्यादेत व त्यापेक्षा कमी रुंदीनुसार विकसीत झालेला आहे.

सदर रस्ता हा 30.0 मी. ऐवजी 60.0 मी. रुंद करणेकामी शासन नगरविकास विभागाने दि.07/10/2024 अन्वये दिलेल्या निर्देशानुसार महानगरपालिकेने विकास योजनेमधील उक्त नमुद 30.00 मी. रुंद रस्त्याची रुंदी 60.00 मी. करणेच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 210 अन्वये रस्त्याच्या रुंदी रेषा निश्चित करणेची कार्यवाही करणेकामी मा.स्थायी समिती ठराव क्र.369 दि.02/01/2025 अन्वये मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने सदरची सुचना ही "दैनिक लोकसत्ता", "दैनिक नवशक्ती" व "परशुराम समाचार" या वृत्तपत्रामध्ये दि.03/01/2025 रोजी प्रसिद्ध करुन 30 दिवसांच्या कालावधीमध्ये सुचना व हरकती सादर करणे बाबत प्रसिद्धीकरण करण्यात आले होते. तसेच उक्त अधिनियमाच्या तरतुदीनुसार सदर सुचना ही प्रस्तावित रस्ता रुंदीकरणाच्या गायमुख ते घोडबंदर रस्त्यावर 06 ठिकाणी नोटीसी प्रसिद्धीकरण केले होते. सदर नोटीसीच्या अनुषंगाने जागामालक / विकासक यांनी या कार्यालयाकडे सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे एकुण 45 सुचना व हरकती प्राप्त झाल्या आहे. सदर हरकतदार व सुचनाधारकांची संयुक्तीक सुनावणी घेणे आवश्यक असल्याने त्यानुसार हरकतदार व सुचनाधारक यांना सुनावणीसाठी मा.आयुक्त सो. यांच्या दालनात उपस्थित राहणेबाबत मा.आयुक्त सो. यांची तारीख व वेळ मिळणेबाबत दि.07/02/2025 रोजी अहवाल सादर केला असता मा.आयुक्त सो. यांनी मा.सहायक संचालक, नगररचना यांना सुनावणी घेणेसाठी प्राधिकृत करुन दि.30/03/2025 पर्यंत सुनावणी पुर्ण करण्यास मा.आयुक्त सो. यांनी दि.10/02/2025 रोजी आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने हरकतदार व सुचनाधारक यांची संयुक्तीक सुनावणी दि.25/02/2025 रोजी आयोजित करण्यात आली

असल्याने सदर सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह उपस्थित राहणेबाबत दि.14/02/2025 रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानुसार हरकतदार व सुचनाधारक यांची दि.25/02/2025 रोजी सुनावणी घेण्यात आली असता सदर सुनावणीस सुचनाधारक व हरकतदार उपस्थित राहुन त्यांनी त्यांचे तोंडी म्हणणे नमुद केले आहे.

प्रस्तावित 60.00 मी. रस्त्याखालील जागा भागश: CRZ व भागश: इको सेनसीटीव झोन, भागश: शासकीय जागा व भागश: वन विभागाची जागा असुन उर्वरित खाजगी मालकीची असल्याने महानगरपालिकेने मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र कोस्टल् झोन मॅनजमेंट ॲथोरिटी यांना दि.16/08/2024 रोजीच्या पत्रान्वये, मा.सदस्य सचिव, संजय गांधी राष्ट्रीय उदयान पर्यावरण क्षेत्र नियंत्रण समिती यांना दि.16/08/2024 रोजीच्या पत्रान्वये तसेच वन विभागाच्या जागेसंबंधित मा.प्रधान सचिव, वन विभाग, महाराष्ट्र राज्य यांना दि.27/01/2025 रोजीच्या पत्रान्वये तसेच शासकीय जमिनी संबंधित मा.जिल्हाधिकारी ठाणे यांना दि.27/01/2025 अन्वये सदर बाबत प्रस्तावित रस्त्याच्या अनुषंगाने पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

शहर अभियंता, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना दि.03/03/2025 रोजीच्या पत्रान्वये सदर रस्ता रुंदीकरणामध्ये महानगरपालिकेच्या अस्तित्वातील बाधीत नागरी सुविधांच्या अनुषंगाने अभिप्राय देणेबाबत कळविले असता त्यांनी दि.10/03/2025 रोजीच्या पत्रान्वये प्रस्तावित रस्त्याखालील जागेमध्ये मंजुर विकास योजनेतील आ.क्र. 372 "उदयान" व आ.क्र. 381 "आदिवासी वस्तीगृह" तसेच प्रारुप विकास योजनेतील आ.क्र. 297 "पब्लिक ॲमिनीटी", आ.क्र. 315 "म्युनिसीपल पर्पज" व अस्तित्वातील स्मशान भुमी ही आरक्षणाने बाधीत होत असुन बाधीत क्षेत्र वगळता आरक्षणाची पुरेशी जागा उपलब्ध आहे. तरी 60.00 मी. रस्ता रुंदीकरणाबाबतची प्रक्रिया करणेस हरकत नसल्याचे कळविले आहे. तथापी रस्ता रुंदीकरणाच्या अनुषंगाने अस्तित्वातील नागरी सुविधा बाबत पत्रात काहीही उहापोह केलेला नाही. सदर प्रस्ताव हा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील तरतुदीनुसार असल्याने, व आरक्षणामधील बाधीत क्षेत्र हे विकास योजना रस्त्यामध्ये अंतर्भुत होणार असल्याने तो एक विकास योजनेचाच भाग असल्याने त्यास कलम 37 अन्वये फेरदबलाची आवश्यकता नाही.

वरील प्रमाणे वस्तुस्थिती विचारात घेता यापुर्वी मुंबई महानगर प्रदेश यांचेकडील झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने फाऊंटन हॉटेल ते गायमुख हा रस्ता अस्तित्वातील रस्त्यासह 60.00 मी. प्रमाणे एका बाजुने (फाऊंटन हॉटेल ते गायमुख कडे जातांना उजव्या बाजुने) रुंद प्रस्तावित केल्यास त्याचे विकसन करण्यात अडचण येणार नसल्याने ते उपरोक्त नमुद प्रमाणे उजव्या बाजुस करणेबाबत महानगरपालिकेने ठराव पारीत करुन रस्त्याची रुंदी 30.00 मी. ऐवजी एका बाजुने (फाऊंटन हॉटेल ते गायमुखकडे जातांना उजव्या बाजुने) नकाशावर दर्शविल्यानुसार करण्याचे प्रस्तावित केले असुन, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या सुचना हरकतीमधील बहुतांश सुचना/हरकती या रस्त्याचे रुंदीकरण किंवा रेषा निश्चिती हे विकास योजनेमधील रस्त्याच्या दोन्ही बाजुस समप्रमाणात करण्याबाबत असल्यातरी अस्तित्वातील रस्त्याच्या डाव्या बाजुस (फाऊंटन ते गायमुख) खोलगट दरीचा

भाग मॅंग्रोज इ.बाबी विचारात घेतल्यास फाऊंटन ते गायमुख जातांना जागेवरील विकसीत झालेल्या रस्त्याच्या डाव्या बाजुकडील हद्दीसह उजव्या बाजुस 60.00 मी. प्रमाणे रस्ता विकसन करणे शक्य होवु शकेल त्यामुळे सदर सुचना हरकती विचारात घेणे संयुक्तीक वाटत नाही. त्याअनुषंगाने उपरोक्त नमुद सुचना हरकती विचारात घेता रस्त्याच्या डाव्या बाजुला मॅग्रोज दरीचा खोलगट भाग असल्याने एका बाजुस म्हणजेच फाऊंटन ते गायमुख जातांना उजव्या बाजुस रस्ता विकसन करणे शक्य असल्याने सदर सुचना हरकती विचारात घेणे संयुक्तीक वाटत नाही.

त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 210 अन्वये रस्त्याची अंतीम रेषा निश्चित करणेचे कार्यवाहीस स्थायी समितीची मंजुरी मिळणेबाबतच्या ठरावास मंजुरी मिळणेबाबत गोषवारा सादर करण्यात येत आहे.

**(पु. म. शिंदे)**
**सहायक संचालक, नगररचना**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(मा. आयुक्त तथा प्रशासके सो., यांचे मान्यतेने.)**

स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि. ०४/०८/२०२५ वेळ ५=४५ वा.
रजिस्टर नोंद अ. क्र. 200 सन 2025-26
लिपिक ०४/८/२५
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. प्रशासकीय ठराव क्र. ९८५ दि. ०५ /०८ /2025

**प्रकरण क्र.९८५:-** मिरा भाईंदर शहराच्या मंजुर विकास योजनेमध्ये मौजे घोडबंदर राज्यमार्ग क्र.84 (फाऊटंन हॉटेल ते गायमुख पर्यंत) मौजे वरसावे येथील स.क्र.21पै., 32पै., 33पै., 34पै., मौजे चेणे येथील स.क्र.4पै., 5पै., 8पै., 9पै., 10पै., 13पै., 14पै., 15पै., 18पै., 26पै., 37पै., 43पै., 44पै., 45पै., 46पै., 47पै., 48पै., 50पै., 52पै., 68पै., 69/1पै., 70/1पै., 81पै., 82पै., 89पै., 99पै., 101पै., 144पै., 148पै., व इतर तसेच गावठाण (काजुपाडा) स.क्र.83पै., 67पै.,, गावठाण (चेणा) चेणा नदी या जमिनीमधील मंजुर विकास योजनेनुसारचा 30.00 मी. रुंदीचा रस्ता 60.00 मी. रुंद प्रस्तावित करणेच्या अनुषंगाने मंजुर विकास योजनेमध्ये <u>महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 210 अन्वये रस्त्याची अंतिम रेषा विहित करणेच्या अनुषंगाने मंजुरी मिळणेबाबत.</u>

### // कार्यालयीन प्रस्तावना //

1) मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन अधिसूचना क्र. टीपीएस-1296/847/सीआर-162/96/युडी-12, दि.14/05/97 अन्वये मंजूर करण्यात आलेली असून ती दि.15/07/97 पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र. टीपीएस-1298/941/सीआर-89/98/युडी-12, दि.25/08/2000 अन्वये मंजूर झालेली असून ती दि.15/10/2000 पासून अंमलात आलेली आहे.
2) मिरा भाईंदर महानगरपालिकेची प्रारुप सुधारीत विकास योजना कलम 26 अन्वये दि. 27/10/2022 रोजी प्रसिद्ध होवुन ती अधिनिमाचे कलम 30 खालील तरतुदीनुसार नियुक्त अधिकारी तथा सहायक संचालक नगररचना, ठाणे शाखा, ठाणे जिल्हा यांनी दि.25/11/2023 रोजी मंजूरीसाठी शासनास सादर केली असून ती अद्याप मंजूर झालेली नाही.

   मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील फाऊंटन गायमुख 30.00 मी. रुंदीचा रस्ता असुन सदर रस्ता हा ठाणे घोडबंदर राज्यमार्ग क्र.84 असुन सदर रस्त्याचे मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील फाऊंटन गायमुख रस्ता 60.00 मी. रुंद केल्यास त्यांचा फायदा नागरीकांना होणार असल्याने सदर रस्त्याबाबत मा.शासनाने दि.07/10/2024 रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 205, 210 नुसार महापालिका आयुक्तांना मंजुर विकास योजना रस्त्याबाबतची संरेखा निश्चित करणेबाबत कळविले असुन याबाबतची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे.

3) सदरच्या मंजुर विकास योजनेनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील फाऊंटन ते गायमुख हा प्रस्तावित रस्ता 30.00 मी. रुंदीचा असुन, सदर रस्ता हा ठाणे घोडबंदर राज्यमार्ग क्र.84 असा असून, सदर रस्त्याचे समुचित प्राधिकरण व अंमलबजावणी संस्था ही सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र राज्य असून, सदर रस्ता हस्तांतरीत करुन घेणेकामी सार्वजनिक बांधकाम विभागाने त्यांचेकडील पत्र क्र.अअ/ठाण/प्रशा-1/3899 दि.21/06/2024 रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेस विनंती केली असून, सदर रस्त्याच्या अनुषंगाने मा.विधानसभा सदस्य श्री.प्रताप सरनाईक यांनी दि.25/06/2024 रोजीच्या पत्रान्वये मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील फाऊंटन हॉटेल ते गायमुख रस्ता 60.00 मी. रुंद केल्यास त्याचा फायदा नागरीकांना होणार असल्याने, सदर रस्ता शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडुन ताब्यात घेवुन सदर रस्त्याचे सर्वेक्षण करुन नविन विकास आराखडयामध्ये सदर रस्त्याचा समावेश करणेची विनंती महानगरपालिकेकडे केली आहे. सदर रस्ता हस्तांतरणाच्या अनुषंगाने महानगरपालिकेने प्रशासकीय ठराव क्र.100 दि.08/08/2024 रोजी पारीत करुन सदर रस्ता महानगरपालिकेकडे हस्तांतरण करणेबाबत पत्र क्र.सांबा/2603/2024-25 दि.13/08/2024 च्या पत्रान्वये अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे यांना कळविले आहे.

4) विषयांकित रस्त्याच्या अनुषंगाने तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील इतर रस्ते विकसनाच्या अनुषंगाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे कार्यालयामध्ये दि.22/07/2024 रोजी बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार फाऊंटन ते गायमुख हा रस्ता विकास योजनेमध्ये 60.00 मी. रुंद प्रस्तावित करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 च्या तरतुदीनुसार महानगरपालिकेने कार्यवाही करणेबाबत झालेल्या चर्चेचे इतिवृत्त मुंबई महानगर विकास प्राधिकरण यांच्याकडील दि.02/08/2024 रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाले आहे. तसेच तद्नंतर विषयांकित रस्त्याच्या अनुषंगाने व महानगरपालिका हद्दीतील इतर विकास कामाच्या अनुषंगाने पुनश्च: दि.06/08/2024 रोजी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या कार्यालयामध्ये बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये फाऊंटन हॉटेल ते गायमुख हा रस्ता अस्तित्वातील रस्त्यासह 60.00 मी. प्रमाणे एका बाजुने (फाऊंटन हॉटेल ते गायमुख कडे जातांना उजव्या बाजुने) रुंद प्रस्तावित केल्यास त्याचे विकसन करण्यात अडचण येणार नसल्याने त्याबाबत मंजुर विकास योजनेमध्ये फेरबदल प्रस्ताव न करता प्रारुप विकास योजना शासनास सादर केलेली असल्याने सदर प्रारुप विकास योजनेमध्ये बदल करणेकामीचा प्रस्ताव शासनास सत्वर सादर करावा असे बैठकीमध्ये निर्देश दिले आहेत.

5) उपरोक्त नमुद केल्यानुसार रस्त्याची रुंदी 60.00 मी. करण्याच्या अनुषंगाने महानगरपालिकेकडुन खाजगी सर्व्हेअरमार्फत सर्व्हे करताना त्यानुसार बाधित होणाऱ्या स.क्र.21 पैकी, भुखंड क्र.अ/1 हॉटेल फाऊंटन तसेच स.क्र.21/1/क मधील शेलार प्रापर्टीज यांचे Express In या हॉटेल करीता परवानगी घेवुन भोगवटा घेतला असल्याने, व सदर रस्ता 30.00 मी. रुंद असताना यापुर्वी सदर हॉटलेची काही जागा 30.00 मी. पेक्षा जास्त रस्ता रुंदीकरण करण्यासाठी दिलेली असल्याने एका

बाजुस रस्ता रुंदीकरण करणेकामी हरकत घेतली आहे. सदर स.क्र.21/पै.,(भुखंड-अ - हॉटेल फाऊंटन) च्या जमिनीस महानगरपालिलकेने पत्र क्र.मनपा/नर/86/3746/03-04 दि.28/10/03 अन्वये तसेच मौजे वरसावे येथील स.क्र.21पैकी, भु.क्र.अ/1 (Hotel Express In) या हॉटेलसाठी महानगरपालिकेने पत्र क्र.मनपा/नर/777/2004-05, दि.22/07/2004 अन्वये भोगवटा दाखला दिलेला असुन, सदर दोन्ही आरक्षणाच्या समोर 30.00 मी. ऐवजी जवळपास 40 ते 50 मी. रुंद रस्ता जागेवर असल्याने, सदर आस्थापनेच्या समोरील अस्तित्वातील रस्ता व त्यालगत असलेला भराव याबाबी विचारात घेता सदर ठिकाणी सदर आस्थापनेच्या जमिनीच्या हद्दीपासुन डाव्याबाजुस रस्ता विकसित होवु शकतो त्यामुळे सदर ठिकाणी रस्त्याचे जक्शन असल्याने रस्ता जक्शन व रस्त्याची सलगता राहणेच्या अनुषंगाने फाऊंटन हॉटेल ते शासकिय विश्रामगृह यापर्यंत वर नमुद केल्यानुसार रस्ता विकसीत करता येवु शकेल. तसेच ठाणे महानगरपालिकेने त्यांचे क्षेत्राची विकास योजना प्रसिध्द केली असुन, त्यामध्ये ठाणे महानगरपालिका हद्दीच्या ठिकाणी मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीच्या ठिकाणी सदर रस्ता दोन्ही बाजुस समप्रमाणात रुंदीकरण प्रस्तावित असल्याने दोन्ही महानगरपालिका हद्दीमध्ये सदर रस्त्याच्या आखणीमध्ये सलगता व एकसुत्रता राहणेच्या अनुषंगाने ठाणे महानगरपालिका हद्दीलगतच्या आखणीमध्ये त्यानुसार दोन्ही बाजुस रुंदीकरण करुन त्याठिकाणच्या रस्त्याच्या आखणीमध्ये एकसलगता / एकसुत्रता करणे आवश्यक आहे.

6) मंजुर विकास योजनेनुसारचा 30.00 मी. रुंदीचा रस्ता 60.00 मी. रुंद प्रस्तावित करणेच्या अनुषंगाने महानगरपालिकेने पत्र क्र.मिभा/मनपा/सांबा/2928/2024-25 दि.30/08/2024 रोजीच्या पत्रान्वये सदर रस्त्याची आखणी 60.00 मी. रुंद करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 154 अन्वये निर्देश देण्याची विनंती शासनास केली असता शासनाने त्यांचेकडील पत्र क्र.टिपीएस-1214/1534/प्र.क.97/24/नवि-12 दि.07/10/2024 अन्वये सदर "फाऊंटन ते गायमुख या दरम्यानच्या 30.00 मी. रुंद रस्ता मंजूर विकास योजनेमध्ये 60.00 मी. रुंद रस्ता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाच्या कलम 154 अन्वये दर्शविण्याची विनंती शासनास केली असली तरी मंजूर विकास योजनेमध्ये कलम 154 अन्वये फेरबदल करता येत नाही. त्यामुळे महानगरपालिकेची सदरचा रस्ता कलम 154 अन्वये मंजूर विकास योजनेमध्ये दर्शविण्याची विनंती मान्य करता येत नाही. तथापि, सदरचा रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 205, 210 नुसार महानगरपालिका आयुक्तांना मंजूर विकास योजनेमध्ये दर्शविता येईल. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांतर्गत दर्शविलेले रस्ते देखील UDCPR मधील तरतुदीनुसार विकसित करण्यास मान्यता असल्याचे शासनाने महानगरपालिकेस कळविले आहे.

7) सदरच्या मंजुर विकास योजनेनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील फाऊंटन ते गायमुख हा प्रस्तावित रस्ता 30.00 मी. रुंदीचा असुन, सदर रस्ता हा ठाणे घोडबंदर राज्यमार्ग क्र. 84 असा असून, सदर रस्त्याचे समुचित प्राधिकरण व अंमलबजावणी संस्था ही सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र राज्य ही होती. तथापि, दरम्यानच्या कालावधीमध्ये सदर रस्ता हा

महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करुन घेणेकामी मा.अधिक्षक अभियंता यांनी पत्र क्र.सांबा/2603/2024-25 दि.13/08/2024 अन्वये महानगरपालिकेस कळविले असता महानगरपालिकेने मा.अधिक्षक अभियंता यांना दि.13/08/2024 रोजीच्या पत्रान्वये सदर रस्ता हस्तांतरीत करुन देण्याची कार्यवाही करणेबाबतची विनंती केली असता सदर रस्ता शासनाने, शासन निर्णय क्र. रविओ-2024/प्रक्र.54/नियोजन-2 दि.03/01/2025 (फाऊंटन हॉटेल ते गायमुख) अन्वये राज्यमार्ग क्र.84 (4.40 कि.मी.) रस्ता मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केला आहे.

मिरा भाईंदर शहराची प्रारुप सुधारीत विकास योजना नियुक्त अधिकारी तथा सहाय्यक संचालक नगररचना ठाणे शाखा कार्यालय यांनी कलम-26 अन्वये दि.28/10/2022 रोजी प्रसिद्ध करुन ती कलम 30 अन्वये दि.25/10/2023 रोजी शासनास मंजुरीसाठी सादर केली असुन सदर विकास योजना अदयाप मंजुर झालेली नाही. सदरच्या प्रारुप विकास योजनेनुसार मिरा भाईंदर हद्दीमधील फाऊंटन हॉटेल ते गायमुख हा रस्ता जागेवर विकसीत झाल्यानुसारच्या अस्तित्वातील रुंदीसह एकुण 30.00 मी. रुंदी प्रमाणे प्रस्तावित असुन, सदर रस्ता हा फाऊंटन हॉटेल ते शासकीय विश्राम गृह पर्यंत अंदाजे 45 ते 50 मी. रुंद विकसीत झालेला असुन तसे प्रारुप विकास योजना नकाशावर अंतर्भुत आहे तर इतर ठिकाणी सदरचा प्रस्तावित 30.00 मी. रुंदीचा रस्ता हा 30.00 मी. रुंदीच्या मर्यादेत व त्यापेक्षा कमी रुंदीनुसार विकसीत झालेला आहे.

सदर रस्ता हा 30.0 मी. ऐवजी 60.0 मी. रुंद करणेकामी शासन नगरविकास विभागाने दि.07/10/2024 अन्वये दिलेल्या निर्देशानुसार महानगरपालिकेने विकास योजनेमधील उक्त नमुद 30.00 मी. रुंद रस्त्याची रुंदी 60.00 मी. करणेच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 210 अन्वये रस्त्याच्या रुंदी रेषा निश्चित करणेची कार्यवाही करणेकामी मा.स्थायी समिती ठराव क्र.369 दि.02/01/2025 अन्वये मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने सदरची सुचना ही "दैनिक लोकसत्ता", "दैनिक नवशक्ती" व "परशुराम समाचार" या वृत्तपत्रामध्ये दि.03/01/2025 रोजी प्रसिद्ध करुन 30 दिवसांच्या कालावधीमध्ये सुचना व हरकती सादर करणे बाबत प्रसिद्धीकरण करण्यात आले होते. तसेच उक्त अधिनियमाच्या तरतुदीनुसार सदर सुचना ही प्रस्तावित रस्ता रुंदीकरणाच्या गायमुख ते घोडबंदर रस्त्यावर 06 ठिकाणी नोटीसी प्रसिद्धीकरण केले होते. सदर नोटीसीच्या अनुषंगाने जागामालक / विकासक यांनी या कार्यालयाकडे सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे एकुण 45 सुचना व हरकती प्राप्त झाल्या आहे. सदर हरकतदार व सुचनाधारकांची संयुक्तीक सुनावणी घेणे आवश्यक असल्याने त्यानुसार हरकतदार व सुचनाधारक यांना सुनावणीसाठी मा.आयुक्त सो. यांच्या दालनात उपस्थित राहणेबाबत मा.आयुक्त सो. यांची तारीख व वेळ मिळणेबाबत दि.07/02/2025 रोजी अहवाल सादर केला असता मा.आयुक्त सो. यांनी मा.सहायक संचालक, नगररचना यांना सुनावणी घेणेसाठी प्राधिकृत करुन दि.30/03/2025 पर्यंत सुनावणी पुर्ण करण्यास मा.आयुक्त सो. यांनी दि.10/02/2025 रोजी आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने हरकतदार व सुचनाधारक यांची

संयुक्तीक सुनावणी दि.25/02/2025 रोजी आयोजित करण्यात आली असल्याने सदर सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह उपस्थित राहणेबाबत दि.14/02/2025 रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानुसार हरकतदार व सुचनाधारक यांची दि.25/02/2025 रोजी सुनावणी घेण्यात आली असता सदर सुनावणीस सुचनाधारक व हरकतदार उपस्थित राहुन त्यांनी त्यांचे तोंडी म्हणणे नमुद केले आहे.

प्रस्तावित 60.00 मी. रस्त्याखालील जागा भागश: CRZ व भागश: इको सेनसीटीव झोन, भागश: शासकीय जागा व भागश: वन विभागाची जागा असुन उर्वरित खाजगी मालकीची असल्याने महानगरपालिकेने मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र कोस्टल् झोन मॅनजमेंट ॲथोरिटी यांना दि.16/08/2024 रोजीच्या पत्रान्वये, मा.सदस्य सचिव, संजय गांधी राष्ट्रीय उदयान पर्यावरण क्षेत्र नियंत्रण समिती यांना दि.16/08/2024 रोजीच्या पत्रान्वये तसेच वन विभागाच्या जागेसंबंधित मा.प्रधान सचिव, वन विभाग, महाराष्ट्र राज्य यांना दि.27/01/2025 रोजीच्या पत्रान्वये तसेच शासकीय जमिनी संबंधित मा.जिल्हाधिकारी ठाणे यांना दि.27/01/2025 अन्वये सदर बाबत प्रस्तावित रस्त्याच्या अनुषंगाने पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

शहर अभियंता, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना दि.03/03/2025 रोजीच्या पत्रान्वये सदर रस्ता रुंदीकरणामध्ये महानगरपालिकेच्या अस्तित्वातील बाधीत नागरी सुविधांच्या अनुषंगाने अभिप्राय देणेबाबत कळविले असता त्यांनी दि.10/03/2025 रोजीच्या पत्रान्वये प्रस्तावित रस्त्याखालील जागेमध्ये मंजुर विकास योजनेतील आ.क्र. 372 "उदयान" व आ.क्र. 381 "आदिवासी वस्तीगृह" तसेच प्रारुप विकास योजनेतील आ.क्र. 297 "पब्लिक ॲमिनीटी", आ.क्र. 315 "म्युनिसीपल पर्पज" व अस्तित्वातील स्मशान भुमी ही आरक्षणाने बाधीत होत असुन बाधीत क्षेत्र वगळता आरक्षणाची पुरेशी जागा उपलब्ध आहे. तरी 60.00 मी. रस्ता रुंदीकरणाबाबतची प्रक्रिया करणेस हरकत नसल्याचे कळविले आहे. तथापी रस्ता रुंदीकरणाच्या अनुषंगाने अस्तित्वातील नागरी सुविधा बाबत पत्रात काहीही उहापोह केलेला नाही. सदर प्रस्ताव हा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील तरतुदीनुसार असल्याने, व आरक्षणामधील बाधीत क्षेत्र हे विकास योजना रस्त्यामध्ये अंतर्भुत होणार असल्याने तो एक विकास योजनेचाच भाग असल्याने त्यास कलम 37 अन्वये फेरदबलाची आवश्यकता नाही.

वरील प्रमाणे वस्तुस्थिती विचारात घेता यापुर्वी मुंबई महानगर प्रदेश यांचेकडील झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने फाऊंटन हॉटेल ते गायमुख हा रस्ता अस्तित्वातील रस्त्यासह 60.00 मी. प्रमाणे एका बाजुने (फाऊंटन हॉटेल ते गायमुख कडे जातांना उजव्या बाजुने) रुंद प्रस्तावित केल्यास त्याचे विकसन करण्यात अडचण येणार नसल्याने ते उपरोक्त नमुद प्रमाणे उजव्या बाजुस करणेबाबत महानगरपालिकेने ठराव पारीत करुन रस्त्याची रुंदी 30.00 मी. ऐवजी एका बाजुने (फाऊंटन हॉटेल ते गायमुखकडे जातांना उजव्या बाजुने) नकाशावर दर्शविल्यानुसार करण्याचे प्रस्तावित केले असुन, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या सुचना हरकतीमधील बहुतांश सुचना/हरकती या रस्त्याचे रुंदीकरण किंवा रेषा निश्चिती हे विकास योजनेमधील रस्त्याच्या दोन्ही बाजुस समप्रमाणात करण्याबाबत असल्या तरी अस्तित्वातील रस्त्याच्या डाव्या

बाजुस (फाऊंटन ते गायमुख) खोलगट दरीचा भाग, जागेवरील मॅंग्रोज इ.बाबी विचारात घेतल्यास फाऊंटन ते गायमुख जातांना जागेवरील विकसीत झालेल्या रस्त्याच्या डाव्या बाजुकडील हद्दीसह उजव्या बाजुस 60.00 मी. प्रमाणे रस्ता विकसन करणे शक्य होवु शकेल त्यामुळे सदर सुचना हरकती विचारात घेणे संयुक्तीक वाटत नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452(अ) च्या (1अ) व (1ब) नुसार महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्र. एम.सी.ओ.2020/ प्रक्र.71(भाग-1)/नवि-14, दि.26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार श्री. राधाबिनोद शर्मा, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. स्थायी समिती सभेचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरून मौजे घोडबंदर राज्यमार्ग क्र.84 (फाऊटंन हॉटेल ते गायमुख पर्यंत) मंजुर विकास योजनेनुसारचा 30.00 मी. रुंदीचा रस्ता जागेवरील विकसित झालेनुसारच्या रस्त्याच्या डाव्या बाजुच्या (साईडपट्टीसह) हद्दीपासुन उजव्या बाजुस (फांऊटन ते गायमुख) उक्त परिच्छेद क्र.5 सह इतर नमुद बाबी विचारात घेवुन त्यानुसारच्या आखणीसह एकत्रितपणे रेखांकन नकाशावर दर्शविल्याप्रमाणे 60.00 मी. रुंद प्रस्तावित करणेच्या अनुषंगाने मंजुर विकास योजनेमध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 210 अन्वये अंतिम रेषा निश्चित करणेकामी मान्यता देण्यात येत आहे. पारित ठरावानुसार संबंधित विभागानने नियमानुसार पुढील कार्यवाही प्रस्तावित करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(राधाबिनोद अ. शर्मा, भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम / विद्युत विभाग

दि. ०५/०८/२०२५

// गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( १०६ ) :-** मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणचे एल.ई.डी. साईन बोर्ड, सेल्फी बोर्ड, सेल्फी पॉईट, पाणपोई व खुल्या जागेतील वॉटर कुलर इत्यादीचे वार्षिक मुदतीने देखभाल दुरुस्ती करणेकामास वाढीव सुधारीत अंदाजित खर्चास मान्यता देणेबाबत. (ई क्र.३९९५०५)

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणचे एल.ई.डी. साईन बोर्ड, सेल्फी बोर्ड, सेल्फी पॉईट, पाणपोई व खुल्या जागेतील वॉटर कुलर इत्यादीचे वार्षिक मुदतीने देखभाल दुरुस्ती करणेकामी कार्यादेश ठेकेदारास देण्यात आलेला आहे. तसेच सदर कामाकरीता प्रचलित कार्यपध्दतीनुसार निविदा प्रकिया सुरु करण्यात आलेली असुन सदयस्थितीत सुरु असलेल्या कार्यादेशाअंतर्गत सदर विविध ठिकाणी एल.ई.डी. साईन बोर्ड, सेल्फी बोर्ड, सेल्फी पॉईट, पाणपोई व खुल्या जागेतील वॉटर कुलर दुरुस्ती कामे अत्यावश्यक असल्याने सदरकामी संबंधित ठेकेदाराकडुन मंजुर दरानुसार काम करुन घेणे आवश्यक आहे त्याअनुषंगाने सदरचे काम अत्यावश्यक असल्याने येणाऱ्या वाढीव खर्चास मान्यता देणे योग्य राहिल.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| 1. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणचे एल.ई.डी. साईन बोर्ड, सेल्फी बोर्ड, सेल्फी पॉईट, पाणपोई व खुल्या जागेतील वॉटर कुलर इत्यादीचे वार्षिक मुदतीने देखभाल दुरुस्ती कामे करणे. | |
| | **मुळ अंदाजित खर्च** | रु.१०,००,०००/- |
| | **सुधारीत अंदाजित खर्च** | रु.१८,००;०००/- |

नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसी ओ-२०२०/प्र.क्र ७१ (भाग-२)/ नवि-१४ दि.२६ ऑगस्ट २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद व विशेषत: कलम ४५२१ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मा. आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असुन त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत.

तरी सदर कामाचे मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणचे एल.ई.डी. साईन बोर्ड, सेल्फी बोर्ड, सेल्फी पॉईट, पाणपोई व खुल्या जागेतील वॉटर कुलर इत्यादीचे वार्षिक मुदतीने देखभाल दुरुस्ती कामे करणेकामी सुधारीत अंदाजित रक्कम रु.१८,००,०००/- खर्चास मान्यता देण्यास शिफारस आहे.

(दिपक खांबित)
**शहर अभियंता**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

PC-03/2025-26/AB/गोषवारा/-02

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## // बांधकाम / विद्युत विभाग //

प्रशासकीय ठराव क्र.   दिनांक :५/८/२०२५

**प्रकरण क्र. (१९६) :-** मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणचे एल.ई.डी. साईन बोर्ड, सेल्फी बोर्ड, सेल्फी पॉईट, पाणपोई व खुल्या जागेतील वॉटर कुलर इत्यादीचे वार्षिक मुदतीने देखभाल दुरुस्ती करणेकामास वाढीव सुधारीत अंदाजित खर्चास मान्यता देणेबाबत. (ई क्र.३९९५०५)

**ठराव क्र. (१९६) :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणचे एल.ई.डी. साईन बोर्ड, सेल्फी बोर्ड, सेल्फी पॉईट, पाणपोई व खुल्या जागेतील वॉटर कुलर इत्यादीचे वार्षिक मुदतीने देखभाल दुरुस्ती करणेकामी कार्यादेश ठेकेदारास देण्यात आलेला आहे. तसेच सदर कामाकरीता प्रचलित कार्यपध्दतीनुसार निविदा प्रकिया सुरु करण्यात आलेली असुन सदयस्थितीत सुरु अर लेल्या कार्यादेशाअंतर्गत सदर विविध ठिकाणी एल.ई.डी. साईन बोर्ड, सेल्फी बोर्ड, सेल्फी पॉईट, पाणपोई व खुल्या जागेतील वॉटर कुलर दुरुस्ती कामे अत्यावश्यक असल्याने सदरकामी संबंधित ठेकेदाराकडुन मंजुर दरानुसार काम करुन घेणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने सदरचे काम अत्यावश्यक असल्याने येणाऱ्या वाढीव खर्चास मान्यता देणे योग्य राहिल.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १) | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणचे एल.ई.डी. साईन बोर्ड, सेल्फी बोर्ड, सेल्फी पॉईट, पाणपोई व खुल्या जागेतील वॉटर कुलर इत्यादीचे वार्षिक मुदतीने देखभाल दुरुस्ती कामे करणे. | |
| | **मुळ अंदाजित खर्च** | रु.१०,००,०००/- |
| | **सुधारीत अंदाजित खर्च** | रु.१८,००,०००/- |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) च्या (१अ) व (१ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक २६ ऑगस्ट २०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, श्री.राधाबिनोद अ. शर्मा, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केल्यानुसार प्रस्तावनेत नमुद मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणचे एल.ई.डी. साईन बोर्ड, सेल्फी बोर्ड, सेल्फी पॉईट, पाणपोई व खुल्या जागेतील वॉटर कुलर इत्यादीचे वार्षिक मुदतीने देखभाल दुरुस्ती करणेकामी रु.१८,००,०००/- सुधारीत खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

**(वासुदेव शिरवळकर)**
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(राधाबिनोद अ.शर्मा, भाप्रसे)
**प्रशासक तथा आयुक्त**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रत बांधकाम / विद्युत विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**

PC-03/2025-26/AB/ठराव -02